# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ०४

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च २०२५

## ।। प्रकटन ।।

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणारी **माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र** (इ.१० वी) ची लेखी परीक्षा **शुक्रवार, दिनांक २१/०२/२०२५ ते सोमवार, दिनांक १७/०३/२०२५ या कालावधीत** आयोजित करण्यात आली आहे.

सदर परीक्षेसाठी एकूण **१६,११,६१०** विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. त्यामध्ये **८,६४,१२०** मुले, **७,४७,४७१** मुली आहेत व **१९** Trans Gender आहेत. एकूण **२३४९२** माध्यमिक शाळांमधून या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून, या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांसाठी **५१३०** मुख्य केंद्रांवर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

### सदर परीक्षेची ठळक वैशिष्टये

१) फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्यात आलेली असून सरल डेटावरुन माध्यमिक शाळांची माहिती घेऊन आवेदनपत्रे ऑनलाईन भरलेली आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी दिनांक २०/०२/२०२५ पर्यंत ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यात आलेली आहेत.

२) विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याच्या दृष्टीने फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचे वेळापत्रक तयार करण्यात आले असून परीक्षेदरम्यान महत्वाच्या बहुतांश विषयांच्या पेपरमध्ये खंड ठेवण्यात आला आहे. **मंडळामार्फत प्रसिध्द व छपाई केलेले वेळापत्रकच ग्राह्य धरावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.**

३) फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचे वेळापत्रक दि.२१/११/२०२४ रोजी मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर केले आहे.

४) परीक्षांच्या कालावधीत अनेक विद्यार्थी नकारात्मक विचाराने किंवा परीक्षेच्या भितीने मानसिक दडपणाखाली असतात अशा विद्यार्थ्यांना नैराश्येतून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी राज्य मंडळ स्तरावरून समुपदेशन करण्यासाठी १० समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी व त्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी विभागीय स्तरावर मंडळामध्ये जिल्हानिहाय प्रत्येकी दोन याप्रमाणे समुदेशकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच राज्यमंडळ व ९ विभागीय मंडळात नियंत्रण कक्ष कार्यरत करुन हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.

५) सदर परीक्षेसाठी नियुक्त केलेले सहाय्यक परिरक्षक (रनर) परीक्षा कालावधीत बैठे पथक म्हणून मुख्य केंद्रावर कार्यरत राहणार आहेत. तसेच त्यांनी परिरक्षण केंद्रावरून गोपनीय पाकिटे ताब्यात घेतल्यापासून ते परीक्षा केंद्रावर पोहोचेपर्यंत व वितरीत करेपर्यंतचे चित्रीकरण मोबाईलमध्ये करण्याबाबतच्या सूचना संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

६) प्रश्नपत्रिकेची गोपनीयता अबाधित राहण्यासाठी मुख्य परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका पोहोच करण्याकरीता व उत्तरपत्रिका आणण्याकरीता नियुक्त करण्यात आलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी जीपीएस प्रणाली सुरू ठेवणे आवश्यक करण्यात आलेले आहे.

७) सर्व परीक्षार्थ्यांना परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी किमान अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर पोहोचण्याच्या सूचना सर्व माध्यमिक शाळांमार्फत परीक्षार्थ्यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच परीक्षार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रवेशपत्रातही (Hall Ticket) नमूद करण्यात आलेले आहे. सकाळ सत्रात स. १०.३० वाजता व दुपार सत्रात दु. २.३० वाजता परीक्षार्थ्यांने परीक्षा दालनात उपस्थित राहणे आवश्यक आहे. सकाळ सत्रात स.११.०० वाजता तसेच दुपार सत्रात दु.३.०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल.

८) गतवर्षीप्रमाणेच फेब्रवारी-मार्च २०२५ परीक्षेसाठी पेपरच्या निर्धारित वेळेनंतर शेवटी दहा मिनिटे वाढवून देण्यात आलेली आहेत.

९) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या पात्र दिव्यांग विद्यार्थ्यांना दिनांक १६/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सवलती देण्यात येत आहेत.

१०) मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या १०० दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमाअंतर्गत मा.शिक्षण मंत्री महोदय व मा.शिक्षण राज्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार राज्यामध्ये फेब्रुवारी-मार्च २०२५ इ.१० वी व इ.१२ वी परीक्षेचेवेळी राज्यातील राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये दि.२० जानेवारी २०२५ ते दिनांक २६ जानेवारी २०२५ या कालावधीत कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला.

११) कोरोना काळातील सन २०२१ व सन २०२२ या दोन परीक्षा वगळून मागील ५ वर्षांच्या म्हणजेच फेब्रुवारी-मार्च २०१८, २०१९, २०२०, २०२३ व २०२४ या परीक्षांमध्ये ज्या परीक्षा केंद्रांवर गैरमार्गाची प्रकरणे आढळून आलेली आहेत अशा परीक्षा केंद्रावर केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींची नियुक्ती सदर केंद्रावर समाविष्ट असणाऱ्या शाळेतील शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर अन्य शाळा/उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांमधून करण्यात येणार आहे.

१२) फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या इ.१० वी व इ.१२ वी परीक्षांमध्ये ज्या परीक्षा केंद्रांवर गैरमार्गाची प्रकरणे आढळून येतील त्या केंद्रांची परीक्षा केंद्र मान्यता पुढील वर्षीपासून कायमची रद्द करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

१३) मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा दक्षता समिती अध्यक्ष यांना त्यांच्या जिल्हयात इ.१० वी व इ.१२ वीची परीक्षा पारदर्शक होण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे नियोजन करण्याची मुभा राहील.

१४) कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत सार्वजनिक परीक्षा निकोप वातावरणात पार पडावी म्हणून राज्य मंडळामार्फत राज्यातील मा. जिल्हाधिकारी (सर्व), मा.विभागीय आयुक्त (सर्व) यांना अर्धशासकीय पत्राव्दारे आवाहन करण्यात आलेले आहे.

१५) विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी महामंडळामार्फत गाडया नियमित व वेळेत सोडणेबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (एस.टी.) महामंडळ यांना तसेच परीक्षा केंद्रावर अखंडीत विदयुत पुरवठा ठेवण्याबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

१६) परीक्षा काळातील संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा यादृष्टीने मंडळामार्फत संपूर्ण राज्यात २७१ भरारी पथके नेमण्यात आली आहे. याशिवाय प्रत्येक जिल्हयामध्ये मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती कार्यरत असून काही विभागीय मंडळात विशेष भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. तसेच मा. विभागीय आयुक्त, मा. जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना परीक्षा केंद्रांना भेटी देण्याबाबत मंडळाकडून विनंती करण्यात आली आहे. तसेच मंडळ सदस्य आणि शासकीय अधिकारी यांना परीक्षा केंद्राना आकस्मिक भेटी देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दूरचित्र प्रणालीव्दारे(V.C) घेतलेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे.

१. राज्यातील संवेदनशील परीक्षा केंद्र परिसरामध्ये जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराव्दारे परीक्षा केंद्राची निगराणी करण्यात येईल.

२. परीक्षा सुरु होण्याअगोदर एक दिवस आधी परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा सुव्यवस्थित आहेत का? याची जिल्हा प्रशासनाकडून खात्री केली जाईल.

३. परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडीओ चित्रीकरण करण्यात येईल.

४. जिल्हयातील सर्व विभागाचे शासकीय अधिकारी व कर्मचा-यांच्या सहाय्याने कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रावर भरारी पथके व बैठी पथके उपलब्ध होतील याचे नियोजन करण्यात येणार आहे.

५. जिल्हा प्रशासनाकडून परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेल्या केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित घटकांची **Facial Recognition System** व्दारे तपासणी करण्यात येईल. तसेच विभागीय मंडळामार्फत परीक्षेशी संबंधित सर्व घटकांना अधिकृत ओळखपत्र देण्यात येईल.

६. **Maharashtra Prevention Of Malpractices Act 1982** या कायद्याची अंमलबजावणी करावी व कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणा-यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येईल.

७. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहेत तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात १६३ कलम लागू करण्यात येईल.

१८) मंडळाने निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा लेखी परीक्षेनंतर दि.१८/०३/२०२५ ते २०/०३/२०२५ या कालावधीत Out of Turn ने आयोजित करण्यात आलेली आहे.

१९) प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत (**Practical & Internal**), श्रेणी इ. परीक्षांचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरून घेण्यात येणार आहेत. याबाबतची लिंक व सविस्तर सूचना विभागीय मंडळांमार्फत सर्व माध्यमिक शाळांना देण्यात आलेल्या आहेत.

२०) उपरोक्त बाबी वेळोवेळी सर्व माध्यमिक शाळांमार्फत विद्यार्थ्यांना कळविण्यासंदर्भात सूचना दिलेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित माध्यमिक शाळांशी संपर्क साधावा. विद्यार्थ्यांनी कोणत्याही गैरप्रकारांच्या प्रलोभनांना बळी पडू नये.

२१) विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात काही अडचणी असल्यास विभागीय मंडळाच्या हेल्पलाईनद्वारे मार्गदर्शन मिळण्यासाठी खालीलप्रमाणे हेल्पलाईन क्रमांक दिलेले आहेत.

विभागीय मंडळनिहाय – हेल्पलाईन दूरध्वनी क्रमांक

| अ. क्र. | विभागीय मंडळ | दूरध्वनी क्रमांक | अ.क्र. | विभागीय मंडळ | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १) | पुणे | मो.क्र.७०३८७५२९७२<br>मो.क्र.९४२३०४२६२७ | ५) | कोल्हापूर | ०२३१–२६९६१०१<br>०२३१–२६९६१०२<br>०२३१–२६९६१०३<br>मो.क्र.९८९०७७२२२९<br>मो.क्र.७६२०८५१९५२<br>मो.क्र.९१७५१०४६२१<br>मो.क्र.९४२२०१३३४१<br>मो.क्र.९७६३८७७७२७ |
| २) | नागपूर | ०७१२–२५५३५०७<br>०७१२–२५५३५०३<br>मो.क्र.९८६०३३०८६०<br>मो.क्र.८८३०४५८१०९<br>मो.क्र.७०२०७३७४३४<br>मो.क्र.९८६०४४०९८६ | ६) | अमरावती | मो.क्र.९८३४७२६३२८<br>मो.क्र.९६७३१६३५२१<br>मो.क्र.९४२१०८७९९६<br>मो.क्र.७९७२६०८८१२ |
| ३) | छत्रपती संभाजीनगर | ०२४०–२३३४२२८<br>०२४०–२३३४२८४<br>मो.क्र.९४०३४०६७२५<br>मो.क्र.९४०४५२६०३६<br>मो.क्र.९४२१७६५६८३<br>मो.क्र.९३२५८१७००६ | ७) | नाशिक | ०२५३–२९४५२४१<br>०२५३–२९४५२५१<br>मो.क्र.९४२३१३१५३१<br>मो.क्र.७७०९८११२२९<br>मो.क्र.९९२१३९०६१३<br>मो.क्र.९०११४९८४९८ |
| ४) | मुंबई | ०२२– २७८८१०७५<br>०२२ –२७८९३७५६<br>मो.क्र.९८९०२६१०४६<br>मो.क्र.९४२३९६१०१४<br>मो.क्र.९४२३४७६०२३<br>मो.क्र.९१४६५४१७७३ | ८) | लातूर | ०२३८२–२५१७३३<br>मो.क्र.९८२२८२३७८०<br>मो.क्र.९४२३७७७७८९<br>मो.क्र.९४२०४३६४८२<br>मो.क्र.९४०५४८६४५५ |
| | | | ९) | कोकण | ०२३५२–२२८४८०<br>०२३५२–२३१२५०<br>मो.क्र.९९२२८४६३६४<br>मो.क्र.९७६४३८४८४३<br>मो.क्र.९९२१८२५३३३ |

तसेच राज्य मंडळ स्तरावरही हेल्पलाईन सुरू करण्यात आली असून त्याचे दूरध्वनी क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत. ०२०–२५७०५२७१, ०२०–२५७०५२७२

**परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा !**

दिनांक– २० /०२/२०२५

(देविदास कुलाळ)
सचिव
राज्य मंडळ, पुणे–०४